पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ७८३ दिनांक - ०३/११/२०२३**

गुन्हे शाखा,पुणे शहर

## ललित अनिल पाटील, अरविंदकुमार प्रकाशचंद्र लोहरे (टोळी प्रमुख) व त्यांचे इतर १२ साथीदार यांचे विरूध्द महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा, सन १९९९ चे कलमा अतंर्गत मकोका कारवाई

यातील फिर्यादी यांना दि.३०/०९/२०२३ रोजी ससुन हॉस्पीटलचे समोर आंबेडकर पुतळाच्या कंम्पाउंन्ड लगत असलेल्या बसस्टॉप शेजारी पुणे येथे सार्वजनिक रोडवर इसम नामे सुभाष जानकी मंडल वय २९ वर्षे,रा.शितला नगर,नुर कार गॅरेज मध्ये,देहुरोड पुणे व मुळ राहणार ग्राम दिग्वाघ पोस्ट बासकुपी तहसिल कोहराम जिल्हा देवघर राज्य झारखंड याच्या ताब्यातुन एकुण २,१६,७६,१००/- कि.चा ऐवज त्यामध्ये एकुन २,१४,३०,६००/- रु.कि.चा १ किलो ७१ ग्रॅम ५३ मि.ग्रॅ. मॅफेड्रॉन (एम.डी.) हा अंमली पदार्थ, १०,०००/- रू चा मोबाईल, रूपये ५,०००/-रोख व रू ५००/- कि.ची सॅकबॅग,आधारकार्ड व पॅनकार्ड व रौफ शेख याचे ताब्यातील १०,०००/- रू चा कि चा मोबाईल व **ललित पाटील याचे ताब्यातील २,२०,०००/- कि.चे दोन मोबाईल,असा अंमली पदार्थ व इतर ऐवज अनाधिकाराने, बेकायदेशिररित्या बाळगताना मिळुन आला**.त्याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादी वरून बंडगार्डन पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्र.३०६/२०२३,एन.डी.पी.एस.ॲक्ट क.८(क),२२(क),२९सह भां.द.वि.क.२०१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

दाखल गुन्ह्याचा तपास करीत असताना आरोपी नामे **१) ललित अनिल पाटील, वय ३७ वर्षे रा.अक्षरधारा सोसायटी फलॅट नं ३०१,मातोश्रीनगर उपनगर नाशिक, २)अरविंदकुमार प्रकाशचंद्र लोहरे, वय ३९ वर्षे रा.१००२ आराधना बिल्डींग,जीएनके सोसायटी,सिटी इंटरनॅशनल शाळेजवळ,ओशिवरा,मुंबई मुळ पत्ता जटनगला पो.बडकली जि.मुज्जफरनगर,उत्तरप्रदेश (टोळी प्रमुख) ३**) अमित जानकी साह उर्फ सुभाष जानकी मंडल वय २९ वर्षे, रा.शितला नगर,नुर कार गॅरेज मध्ये,देहुरोड पुणे, ४) रौफ रहिम शेख, वय १९ वर्षे,रा.ताडीवाला रोड पुणे, ५) भुषण अनिल पाटील,वय ३४ वर्षे रा.अक्षरधारा सोसायटी उपनगर,नाशिक, ६) अभिषेक विलास बलकवडे,वय ३१ वर्षे रा.विजय ॲनेक्स,टाकळी रोड नाशिक, ७) रेहान उर्फ गोलु आलम सुलतान अहमद अन्सारी, वय २६ वर्षे रा.सुंदरम बिल्डिंग,धारावी क्रॉस रोड,मुंबई मुळगाव गोसाईगंज,अयोध्या उत्तरप्रदेश, ८) श्रीमती प्रज्ञा अरुण कांबळे उर्फ प्रज्ञा रोहित माहिरे,वय ३९ वर्षे रा.डि.विंग,स्पेस ओरियन सोसायटी, दत्तमंदिर चौक,नाशिक रोड,नाशिक ९) जिशान इकबाल शेख,वय ३३वर्षे रा.फ्रेंड्स कॉलनी उपनगर,नाशिक, १०) शिवाजी अंबादास शिंदे,वय ४० वर्षे रा.कसारा रो हाऊस नं.५ रा,एकता नगर बोरगड,नाशिक ११) राहुल पंडीत ऊर्फ रोहितकुमार चौधरी ऊर्फ अमितकुमार, वय ३० वर्षे रा.जिवदाणी रोड, जनकपूर धाम,विरार (पूर्व) मूळगाव जमवा पो वाडी थाना सिंधीया जि समस्तीपूर बिहार **(टोळी सदस्य)** हे आरोपी दाखल गुन्ह्यात निष्पन्न झाल्याने त्यांना अटक करण्यात आली आहे.तसेच दाखल गुन्ह्यात इतर १) समाधान बाबाजी कांबळे रा.नांदुर नाशिक, २) इम्रान शेख उर्फ अमीर खान,रा. गणेश मंदीराजवळ क्रॉस रोड धारावी मुंबई, ३) हरिश्चंद्र उरावादत्त पंत,वय २९ वर्षे रा.बिल्डिंग नं.०१,फ्लॅट नं.४०२, बी विंग,ओरयन बिल्डिंग, ठक्कर गॅलेक्सी, भोईसर (पश्चिम) मुंबई हे पाहीजे आरोपी आहेत

सदर आरोपीचे पुर्व रेकॉर्डची पाहणी करता नमूद गुन्हयातील आरोपी **ललित अनिल पाटील ,अरविंदकुमार प्रकाशचंद्र लोहरे,(टोळी प्रमुख)**याने स्वतःचे नेतृत्वाखाली संघटीत गुन्हेगारी टोळी तयार केली असुन केली असुन त्यामध्ये वेगवेगळे सदस्य घेवुन मागील १० वर्षात टोळीतील सदस्यांनी एकटयाने किंवा संघटीतरित्या, अंमली पदार्थचा साठा करणे, विक्री करणे, वाहतुक करणे व निर्मिती करणे, अशा प्रकारचे गुन्हे केल्याचे निदर्शनास आले आहे. सदरचे गुन्हे हे अवैध मार्गाने स्वतःसाठी व इतरांसाठी गैरवाजवी आर्थिक लाभ आणि इतर फायदे मिळविण्याकरीता गुन्हे केल्याचे निष्पन्न होत आहे.

दाखल गुन्हयास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा, सन १९९९ चे कलम ३(१) (ii), ३(२), ३(४), ३(५) व ४ या कलमाचा अंतर्भाव करणेकामी गुन्हे शाखेचे सहा.पोलीस आयुक्त श्री सुनिल तांबे यांनी पोलीस उप-आयुक्त गुन्हे शाखा,पुणे,श्री.अमोल झेंडे,यांच्या मार्फतीने अपर पोलीस आयुक्त गुन्हे शाखा.पुणे श्री,रामनाथ पोकळे यांना प्रस्ताव सादर केला होता.

सदर प्रकरणाची छाननी करुन बंडगार्डन पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्र. ३०६/२०२३, एन.डी.पी.एस. अॅक्ट कलम ८(क),२२(क),२९ सह भां.द.वि.कलम २०१ प्रमाणे दाखल असलेल्या गुन्हयांमध्ये महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा,सन १९९९ चे कलम ३(१) (ii), ३(२), ३(४), ३(५) व ४ या कलमाचा अंतर्भाव करण्याची अपर पोलीस आयुक्त गुन्हे शाखा.पुणे श्री,रामनाथ पोकळे यांनी मान्यता दिलेली आहे.

सदर गुन्हयाचा पुढील तपास सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे १ पुणे शहर,श्री सुनिल तांबे हे करीत आहेत.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.रितेश कुमार यांनी पुणे पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार स्वीकारल्या नंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारीक लक्ष देवुन शरीराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व समाजामध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश दिले आहेत. **त्यांचे मार्गदर्शनाखाली मकोका अंतर्गत केलेली सन-२०२३ या चालु वर्षातील एकुण ७६ वी कारवाई आहे.**